# समाजशास्त्र विभागामार्फत"भारतीय सण उत्सव आणि समाज" या विषयावर भित्तीपत्रक प्रकाशन




भारतीय सण उत्सव आणि समाज या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील समवेत डॉ. एस. एस. कुरलीकर, डॉ. बी. एन. रावण, प्रा.दत्तात्रय नाईक

मानवी जीवनात उन्नती साधायची असेल तर आपल्या सण उत्सवांचे महत्त्व लक्षात घेऊन जगले पाहिजे. तसेच , विज्ञानाला अध्यात्माची जोड दिली की जीवनात समन्वय साधण्यात मदत होते असे प्रतिपादन प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील समाजशास्त्र विभागामार्फत आयोजित केलेल्या "भारतीय सण उत्सव आणि समाज" या विषयावर आयोजित केलेल्या भित्तीपत्रक प्रकाशन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राध्यापक डॉ. बी. एन. रावण होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले भारतीय संस्कृतीमध्ये सण-उत्सव याला अनन्य साधारण महत्व आहे. भारतीय संस्कृतीची महती संपूर्ण जगाने स्वीकारलेले आहे त्यामुळे आपणही आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण,सहसमन्वक डॉ.एस.एस.कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस. एस.कुरलीकर यांनी केले तर आभार हर्षदा लव्हटे हीने मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.